PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Hi Poragi Konachi
Year: 2006

Song: Doyivarti Chandra Maluni
Lyricist: Mangesh Kulkarni

डोईवरती चंद्र माळूनी
घे पदरावर चमचम तारे
हाती बांगडया हिरव्या हिरव्या
हळदी उन्हाचे गंधित वारे
डोईवरती चंद्र माळूनी
घे पदरावर चमचम तारे
हाती बांगडया हिरव्या हिरव्या
हळदी उन्हाचे गंधित वारे
सोनसाजरी पिवळी पिवळी
सजली नटली नवरी रे
काजळ भरले आतूर डोळे
सजणाविन का बावरे

अरे रे रे....
कशी गोरी मोरी गोरी मोरी
गोरी नवरी लाजली
अय्ययो अय्ययो अय्ययो
नजर न लागो अय्ययो
अय्ययो अय्ययो
तुला नजर न लागो अय्ययो

हे...
ओय ओय ओय ...

कळीची बघता बघता
सोनुली मुलगी झाली
पाकूळी होती कोवळी
तिची फुलराणी झाली
भ्रमर राजाला त्याची
सुगंधित वार्ता गेली
प्रेम रोगाची बाधा
राणी राजाला झाली
कहाणी प्रेम दिवाणी
चार चौघात गाजली
कहाणी प्रेम दिवाणी
चार चौघात गाजली

अरे रे रे....
कशी गोरी मोरी गोरी मोरी
गोरी नवरी लाजली
अय्ययो अय्ययो अय्ययो
नजर न लागो अय्ययो
अय्ययो अय्ययो
तुला नजर न लागो अय्ययो

आई होण्याची आशा
मनाने धरली होती
गाठ लग्नाची माझ्या
नशिबी लिहिली नव्हती
नियतीने किमया केली
नियतीने किमया केली
पोर ओटीत टाकली
लाडकी माझी बाई
बोहल्याकडे चालली
ओ... ओ...
असे का काळीज तुटते
उगा का काहूर उठते
असे का काळीज तुटते

Literacy for a Billion

उगा का काहूर उठते
वाटते जणू स्वतःची
पोर सासरी निघाली
अरे रे रे....

हे...
ओ ओ ओ ...

दिसला दिसला साजण दिसला
नजर भेट ही लाजरी
दिसला दिसला साजण दिसला
नजर भेट ही लाजरी

राजस चिकणी झक्क देखणी
नवरदेवाची ही स्वारी
राजस चिकणी झक्क देखणी
नवरदेवाची ही स्वारी

अरे रे रे....
कशी गोरी मोरी गोरी मोरी
गोरी नवरी लाजली
अय्ययो अय्ययो अय्ययो
नजर ना लागो अय्ययो
अय्ययो अय्ययो
तुला नजर न लागो

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*